| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./2062/२०२४ दिनांक :- २०/०३/२०२४

## प्रेसनोट

गणेशखिंड रोडवर पुणे विद्यापीठ चौकामध्ये उड्डाणपूल व मेट्रो बांधकाम काम सुरू आहे. त्यामुळे दोन्ही बाजुचा रस्ता अरुंद झालेला असल्यामुळे गणेशखिंड रोडवर वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी गणेशखिंड रोड वरील वाहतूकीमध्ये बदल करणे गरजेचे आहे.

याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये गणेशखिंड रस्त्यावर जावक क्रमाक १६८२/२०२४ दिनांक ०२/०३/२०२४ नुसार प्रायोगीक तत्वावर बदल करण्यात आले होते. त्यामध्ये अंशतः बदल करून मी रोहिदास पवार, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पुणे शहर, दिनांक २२/०३/२०२४ पासुन वाहतूकीमध्ये अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन तात्पुरत्या स्वरूपात प्रायोगीक तत्वावर बदल करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी असलेले वाहतूकीचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील.

१. पुणे विद्यापीठ चौकामधुन गणेशखिंड रोडने सेनापती बापट रोड कडे जाणाऱ्या वाहनांसाठी सेनापती बापट रोड जंक्शन येथून उजवीकडे प्रवेश बंद राहील.

➢ वाहनचालकांनी कॉसमॉस बँकेसमोरून यु टर्न घेवून सेनापती बापट रोड जंक्शन वरून डावीकडे वळण घेवून जावे.

२. शिवाजीनगर कडुन गणेशखिंड रोडवर येणाऱ्या व रेंज हिल्स्कडे जाणाऱ्या वाहनांसाठी रेंज हिल्स् कॉर्नर येथे उजवीकडे प्रवेश बंद राहील.

➢ वाहन चालकांनी कॉसमॉस बँकेसमोरुन यु टर्न घेवून रेंज हिल्स् कॉर्नर येथून डावीकडे वळण घेवून रेंज हिल्स् कडे जावे.

३. **पुणे विद्यापीठ चौकामधुन औंध/सांगवी/डांगे चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना औंध रोडवरून प्रवेश बंद राहील.**

➢ **पर्यायी मार्ग :-** पुणे विद्यापीठ चौकामधुन बाणेर रोडने जावे व राजभवनच्या पाठीमागील बाजुस यु टर्न घेवून पुणे विद्यापीठ चौकामध्ये यावे व डावीकडे वळण घेवून औंध रोडने जावे

४. **पुणे विद्यापीठ चौकामधुन बाणेरकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बाणेर रोडवरून प्रवेश बंद राहील.**

➢ **पर्यायी मार्ग :-** पुणे विद्यापीठ चौकामधुन डावीकडे वळणे घेवून पाषाण रोडने अभिमानश्री जंक्शन येथून उजवीकडे वळण घेवून बाणेर रोडला येवून बाणेरकडे जावे.

५. **बाणेर व औंध रोडवरून पुणे विद्यापीठ चौकामध्ये येणाऱ्या वाहतूकीमध्ये कोणताही बदल केलेला नाही**

**खालील मार्गावर सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहने, ट्रक, ट्रेलर्स, कंटेनर्स यांना २४ तास प्रवेश बंद राहील.**

अ) गणेशखिंड रोडवरील चाफेकर चौक ते पुणे विद्यापीठ चौक

ब) औंध रोडवरील ब्रेमेन चौक ते पुणे विद्यापीठ चौक

क) बाणेर रोडवरील अभिमानश्री चौक ते पुणे विद्यापीठ चौक

ड) पाषाण रोडवरील अभिमानश्री चौक ते पुणे विद्यापीठ चौक

इ) सेनापती बापट रोडवरील जे. डब्ल्यू. मेरीएट हॉटेल चौक ते पुणे विद्यापीठ चौक

६. भाजीपाला वाहतूक करणारे तीनचाकी पिकअप, तसेच तीनचाकी, चारचाकी मालवाहतूक करणारी सर्व प्रकारची वाहने, स्लो मुव्हींग वाहने उदा. डंपर, मिक्सर, जे.सी.बी., रोड रोलर व इतर वाहने यांना **सकाळी ०८:०० ते १२:०० व १६:०० ते २२:०० वा. दरम्यान प्रवेश बंद राहील**

**( रोहिदास पवार )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-

१. **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – १,२,३ पुणे शहर.**

२. **पोलीस निरिक्षक,** प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे
२/- सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३. **प्रभारी अधिकारी, भारती विद्यापीठ, चतुःश्रुगी** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- सदरबाबत म.न.पा. पुणे यांचेकडून वरील प्रमाणे फलक बसवुन घेवुन ०७ दिवसांत पुर्तता अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

४. **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.

५. **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.

६. **मा. सहाय्यक अभियंता** (ट्रॅफिक प्लॅनिंग), म.न.पा. पुणे
२/-सदर ठिकाणी वरीलप्रमाणे फलक बसविणेबाबतची कार्यवाही होणेस विनंती आहे.

**प्रति, व्यवस्थापक,** येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे
२/-सदरचा आदेश राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या ५ प्रती इकडील कार्यालयात पाठविण्याची विनंती आहे.